क्र.स्था.१८/ब/ स्था.नि.ले.प./शासकीय कर वसुली /वलेप अहवाल/न.क्र.१८३/

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य,**
**कोंकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई -४०० ६१४**

**स्थायी आदेश क्र. ९३ /२०१७, दिनांक** 14 JUN 2017

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालांतील विविध शासकीय करांच्या वसुलीच्या परिच्छेदांबाबत.

प्रस्तावना:-

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० व नियम १९३१ नुसार या संचालनालयाकडून स्थानिक स्वराज्य व इतर संस्थांचे लेखापरीक्षण करण्यात येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणादरम्यान लेखापरीक्षण अहवालांमध्ये विविध विकासकामे / बांधकामे व खरेदीच्या प्रस्तावांच्या देयकांमधुन आयकर, स्वामित्वधन, कामगार कल्याण उपकर, मुल्यावर्धित कर, विमा इत्यादी शासकीय करांच्या वसुलीबाबत आक्षेप नोंदविण्यात येतात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालांचे अवलोकन केले असता करांच्या वसुलीसंदर्भात प्रत्येक बांधकामासाठी अथवा खरेदीच्या प्रस्तावांसाठी स्वतंत्ररित्या आक्षेप नोंदविण्यात आल्याने, लेखापरीक्षण अहवालांतील आक्षेपांच्या संख्येत अनावश्यक वाढ होते. तसेच कराच्या एकुण वसुलपात्र रकमेचा तपशिल एकाच ठिकाणी उपलब्ध होत नाही. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

आदेश:-

१. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियमित लेखापरीक्षणादरम्यान त्यांनी केलेल्या विकासकामे / बांधकामे तसेच खरेदी प्रस्तावातील तपासणीत आढळून आलेल्या खालील करांच्या वसुलपात्र रकमेसंदर्भात **प्रत्येक करनिहाय एकच स्वतंत्र परिच्छेद** नोंदविण्यात यावा.

**अ) ग्रामीण स्वराज्य संस्थांकडून वसुल होणारे शासकीय कर :-**

आयकर , स्वामित्वधन, कामगार कल्याण उपकर, मुल्यावर्धित कर, विमा, विक्रीकर व इतर कर.

**ब) नागरी स्वराज्य संस्थांकडून वसुल होणारे शासकीय कर :-**

आयकर, कामगार कल्याण उपकर, प्रवासी उपकर, रोजगार हमी उपकर, राज्य शिक्षण कर, शिक्षण उपकर, वृक्षकर, पथकर, गौण खनिज स्वामित्व धन, कामगार विमा, मूल्यवर्धित कर, सेवाकर, दुरुस्ती उपकर व इतर कर.

२. करनिहाय परिच्छेद नोंदविताना संबंधित कर वसुलीसंदर्भातील सर्व विकासकामे / बांधकामे तसेच खरेदी प्रस्तावांचा तपशिल तक्तांकनास्वरुपात नमुद करावा. तसेच सदर कराच्या एकुण वसुलीची रक्कम परिच्छेदाअंती दर्शविण्यात यावी.

सदरचा आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सन २०१६-१७ च्या नियमित लेखापरीक्षणापासुन लागु करण्यात येत आहे.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:- सर्व सह संचालक व जिल्हा सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, यांना कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रमाणे सर्व लेखापरीक्षकांना योग्य त्या सुचना दयाव्यात.